

# गणवेश व शिस्त मार्गदर्शिका

महाराष्ट्र वनविभागातील
अधिकारी व कर्मचारी यांचेसाठी

वनविभाग
महाराष्ट्र राज्य

# गणवेष व शिस्त

*(मार्गदर्शिका)*

## महाराष्ट्र - वन विभागातील
## अधिकारी / कर्मचारी यांचेसाठी

वन विभाग
महाराष्ट्र राज्य, पुणे.

## मूळ लेखन / संकल्पना

- अरविंदकुमार झा (भा. व. से.)
  वनसंरक्षक.

## शब्दांकन

- व्ही. यू. साळूंखे
  सहाय्यक वनसंरक्षक
- अ. ना. क्षीरसागर
  सहाय्यक वनसंरक्षक.

## सजावट

- अ. ना. क्षीरसागर
  सहाय्यक वनसंरक्षक.

## चित्रकार

- म. व. हुबळीकर
  वनरक्षक (प्रशिक्षणार्थी, नाशिक वृत्त)
  सत्र - १६ (जुलै-डिसेंबर ९७)
  वनरक्षक प्रशिक्षण विद्यालय,
  जालना.

## मुद्रित शोधन

- अ. रा. पुरोहित, स. व. सं.
- दि. चिं. पटवर्धन, स. व. सं.
- र. द. कुळकर्णी, व. प. अ.

## सौजन्य

मुख्य वनसंरक्षक
महाराष्ट्र वानिकी प्रकल्प (समन्वय घटक)
महाराष्ट्र राज्य, पुणे - ४२.

# मनोगत

महाराष्ट्र राज्यातील वनविभागामध्ये वनरक्षकापासून वनक्षेत्रपालांच्या संवर्गापर्यंत गणवेष घालणे बंधनकारक आहे. तथापि, गणवेषाचे निकष व गणवेष धारण केल्यानंतर पाळावयाची शिस्त आणि वागणुकीबाबत मार्गदर्शक तत्वे सध्या तपशीलवार उपलब्ध नाहीत. गणवेषाची दैनंदिन निगा व देखभाल त्याचप्रमाणे गणवेष वापरण्याबाबत मार्गदर्शक सूचना असणारी एक पुस्तिका तयार करण्याच्या आवश्यकतेबाबत फार पूर्वीपासून विचार चालू होता. त्याच हेतूने वनविभागातील गणवेष व पाळावयाची शिस्त याबाबत मार्गदर्शक तत्वे व सूचना समयोचित सुधारणांसह एकत्रित असाव्यात या उद्देशाने गणवेषाचे व शिस्तीचे मापदंड निश्चित करताना सेनादल व पोलीस विभागात सध्या अस्तित्वात व अंमलात येत असलेल्या मार्गदर्शक सूचनांचा देखिल आधार घेण्यात आला आहे. वनविभागात उत्तम प्रतीची शिस्त येणे व संपूर्ण राज्यांत गणवेषाचे सुसूत्रिकरण व्हावे, हा या पुस्तिकेचा उद्देश आहे.

या मार्गदर्शक सूचना सर्वांनाच उपयुक्त ठरतील अशी माझी अपेक्षा आहे.

पुणे
दि. ३१.०३.१९९८

(अरविंदकुमार झा)
वनसंरक्षक
वनशिक्षण वृत्त, म.रा. पुणे.

# अनुक्रमणिका


१) प्रतिज्ञा

२) गणवेष परिधान करतेवेळी घ्यावयाची काळजी

३) वनक्षेत्रपाल, वनपाल, वनरक्षक, वाहनचालक, नाईक, चपराशी, सफाई कामगार यांचे गणवेषाचे विहितक (Prescription)

४) पदक / फिती परिधान करणे

५) परेड आणि सलामी
सावधान, विश्राम, परेड, स्लो मार्च, सलामी,
गार्ड ऑफ ऑनर, पदक, फिती स्विकारण्याची पद्धत

६) गणवेष पुरवठा

७) गणवेष परिधान करण्याची पद्धत

८) वनपाल व वनरक्षक यांनी दररोज जवळ बाळगावयाचे साहित्य

# प्रतिज्ञा

कर्तव्य निष्ठेची जाण ठेवून

प्रतिज्ञा करतो की,

मी मातृभूमीची माती, पाणी, वनस्पती

आणि

प्राणिमात्रांचे संरक्षण करीन

आणि

संतुलीत पर्यावरण राखण्याचा

आटोकाट प्रयत्न करीन.

## गणवेष धारण करतेवेळी घ्यावयाची काळजी

### सर्वसाधारण

१. गणवेषाच्या नीटनेटकेपणामुळे आपला स्तर उंच होतो.

२. गणवेष नेहमी स्वच्छ आणि नीटनेटका, इस्त्री केलेला असावा, बूट पॉलिश केलेले असावेत.

३. गणवेष केव्हाही पूर्ण असावा.

### कॅप

१. कॅप धुतलेली, इस्त्री केलेली आणि डोक्याच्या मापात बसेल अशीच असावी. बॅरेट कॅप वरील मोनोग्राम डाव्या डोळयाच्या मध्यावर असावा.

२. बॅरेट कॅपची रिम डोळयाच्या रेषेला समांतर असावी.

३. कॅपवरील बटण / मोनोग्राम शुभ्र धातूचे आणि चमकदार ठेवले पाहीजे.
(फक्त वाहन चालकांसाठी मोनोग्राम पितळी असले पाहिजेत.)

४) वनरक्षकाच्या एफ कॅप च्या डाव्या वरील भागात मोनोग्राम असून तो हिरवट कड्याच्या वर असावा.

५) वनरक्षकाची कॅप ४ अंश वर उजवीकडे कललेली असावी.

### नामनिर्देश पट्टी

१. काळ्या पट्टीवर पांढरी नामनिर्देशक अक्षरे असून ती उजव्या बाजू वरील छातीवरील खिशाचे २ मि.मि. वर लावण्यात यावी.

२. 'वनरक्षक' पट्टी डाव्या खिशावर लावू नये. फक्त वाहनचालकांनी 'वाहनचालक' अशी नेमप्लेट (काळी प्लॅस्टीक) डाव्या खिश्याच्यावर लावावयाची आहे.

### बुशशर्ट / पॅन्ट

१. बुशशर्टच्या बटणांची लाईन पॅन्टच्या झिप लाईनवर असावी.

२. बुशशर्ट पॅन्टच्या आत खोचण्यात यावा आणि सैल होवून तो बेल्टवर येवू देऊ नये. बुशशर्ट नेहमी समोरच्या बाजूस ताणलेला असावा.

३. पॅन्टचा खालचा तळघेर इतकाच असावा की, सावधान अवस्थेत चामडीच्या बूटाचे फक्त पुढील दोन फित छिद्र पंक्ती दिसतील.

### थंडर शिट्टी दोर

१. वनक्षेत्रपाल व वनपालासाठी हिरवटसर पिवळ्या रंगाची व वनरक्षकासाठी काळ्या रंगाची असावी.

२. शिट्टी खिशात घालून अशाप्रकारे ठेवावी की त्याची अर्धी गाठ बाहेरून दिसेल.

३. शिट्टी डाव्या खांद्याच्या बगलेत असावी व शिट्टी डाव्या खिशात वरीलप्रमाणे ठेवावी.

## गणवेष परिधान केल्यानंतर पाळावयाचा शिष्टाचार

१. गणवेष केव्हाही न चुरगळलेला, स्वच्छ व पूर्ण असावा.

२. सार्वजनिक ठिकाणी बोलण्याची वागण्याची पद्धत संयमी असावी. अरेरावीची नसावी.

३. कामाशिवाय सार्वजनिक ठिकाणी गणवेष परिधान करून रेंगाळू नये.

४. गणवेष परिधान करून अशोभनीय वर्तन करू नये.

५. कोणत्याही परिसरातील आपल्या संवर्गाला शोभेल अशा उपहारगृहात गरज पडल्यासच जावे.



## 'एफ' कॅप घालणे

१. टोपीचा खालचा काठ हा भुवयीपासून २ से. मी. अंतरावर असावा.

२. टोपीची समोरील घडी ही नाकाच्या रेषेला ४ अंशाच्या कोनात उजव्या बाजूस कललेली असावी.


३. टोपीवरील मोनोग्राम हिरव्या भागाच्या वर असावा.




## चुकीची 'एफ' कॅप घालणे

i) टोपीची समोरील घडी ही डाव्या बाजूस कललेली आहे.


ii) टोपीवरील मोनोग्राम हा उजव्या बाजूस आहे.











## टोपी घालणेची योग्य पद्धत

१. टोपीचा खालचा काठ हा भुवयांपासून २ से. मी. अंतरावर असावा.

२. टोपीचा खालचा काठ हा डोळ्याच्या रेषेला समांतर असावा.

३. टोपी उजव्या कानावर ओढून असावी.

४. टोपीवरील मोनोग्राम हा डाव्या डोळ्याच्या मध्यावर असावयास पाहिजे.

## चुकीची टोपी घालणे

अ) टोपीचा खालचा काठ हा भुवयांपासून २ से. मी. अंतरावर नाही.

ब) टोपीचा खालचा काठ हा डोळ्याच्या रेषेला समांतर नाही.

क) टोपीने डावा कान अर्धवट झाकलेला आहे.

ड) टोपीवरील मोनोग्राम हा उजव्या बाजूस आहे.

इ) टोपीच्या काठातील दोरी ही मागील बाजूस बाहेर आलेली आहे.




·वनक्षेत्रपाल·


## गणवेषांचे विहितक

| पदनाम | | गणवेषाच्या बाबीचे विवरण |
|---|---|---|
| वनक्षेत्रपाल | पॅन्ट | खाकी टेरिकॉट (६७% पॉलीस्टर आणि ३३% कॉटन). तळकाठ न दुमडलेले, पट्टा बसविण्यासाठी तीन एकेरी पट्ट्या, दोन्ही बाजूला सरळ खिसे, मागे एक खिसा. |
| | बुशशर्ट | खाकी टेरिकॉट (६७% पॉलीस्टर आणि ३३% कॉटन) अर्ध्या बाह्या, दोन बॅच पॉकेटसह, १२.५ से.मी. × १४ से.मी. चे फ्लॅपसह, दोन खिसे, प्रेस बटणासह, पॅन्टच्या आत बसविणे, स्टारसाठी खांद्यावर पट्ट्या त्यावर स्टारसाठी छिद्रे व महाराष्ट्र वन विभाग' बॅजसाठी दोन छिद्रे. |
| | स्टार | ७ वर्षापेक्षा कमी सेवा असलेले अधिकारी दोन स्टार तर ७ वर्षापेक्षा अधिक सेवा झालेले अधिकारी तीन स्टार साठी पात्र असतील. स्टार शुभ्र धातूचे पंचकोनी २.५ से.मी. आकाराचे कोणतेही नक्षीकाम नसलेले असले पाहिजेत. |
| | नामनिर्देश पट्टी | प्लॅस्टिक, उजव्या छातीच्या खिशावर, आकार २ से.मी. × ८ से.मी. काळ्या रंगाच्या पट्टीवर पांढरी नामनिर्देशक अक्षरे. |
| | पट्टा | ५ से.मी. रूंदीच्या तपकिरी रंगाचा चामड्याचा पट्टा क्रोमीयम प्लेट बक्कलावर 'वने' अक्षरे असलेला. |
| | शिट्टी | डाव्या बाजूवरून खिशात ठेवण्यासाठी हिरवटसर पिवळ्या रंगाच्या दोरीला बांधलेली 'थंडर' शिट्टी. |
| | जरसी | हिरवटसर खाकी रंगाची, 'व्ही' आकाराचा गळा, कॉलर नसलेली, दोन्ही खांद्यावर चिरलेला. |
| | रेनकोट | खाकी रंगाचा |
| | बॅरेट कॅप | वूलन निळ्या रंगाची, अखंड शुभ्रधातूची 'वने' अक्षरे असलेल्या बॅजसहीत. |
| | बूट | तपकिरी रंगाचे, चामडीचे, रबराचे तळ, पुढील बाजू गोलाकार. |
| | हंटरशूज | ठराविक पद्धतीचे |
| | सॉक्स | खाकी स्ट्रेचेबल टेरिकॉट |




• वनपाल •

| पदनाम | | गणवेषाच्या बाबीचे विवरण |
|---|---|---|
| वनपाल | पॅन्ट | खाकी टेरिकॉट (६७% पॉलीस्टर आणि ३३% कॉटन). तळकाठ न दुमडलेले, चामडी पट्ट्यासाठी तीन एकेरी पट्ट्या, दोन्ही बाजूला सरळ खिसे, पाठीमागे एक खिसा. |
| | बुशशर्ट | खाकी टेरिकॉट कापड (६७% पॉलीस्टर आणि ३३% कॉटन) अर्ध्या बाह्यांचे, दोन पॅच पॉकेटसह, १२.५ सें.मी. × १४ से.मी. चे खिसे, प्रेस बटणासह, पॅन्टच्या आत बसविणे, खांदपट्ट्या त्यावर स्टारसाठी व 'महाराष्ट्र वन विभाग' बॅजसाठी छिद्रे. |
| | स्टार | शुभ्र धातुचा पंचकोनी २.५ सें.मी. आकाराचा कोणतेही नक्षीकाम नसलेला एक स्टार |
| | नामनिर्देश पट्टी | उजव्याबाजूवरील छातीवरील खिशावर, आकार २ सें.मी. × ८ सें.मी. प्लॅस्टीक काळ्या रंगाच्या पट्टीवर पांढरी नामनिर्देशक अक्षरे |
| | बेल्ट | ५ से.मी. रूंदीच्या तपकिरी रंगाचा चामड्याचा पट्टा क्रोमीयम प्लेट बक्कलावर 'वने' अक्षरे असलेला पाहिजे. |
| | शिट्टी | हिरवटसर पिवळ्या रंगाच्या दोरीला बांधलेली व छातीवरील डाव्या भागावरील खिशात ठेवलेली 'थंडर' शिट्टी. |
| | जरसी | हिरवटसर खाकी रंगाची, 'व्ही' आकाराचा गळा, कॉलर नसलेली, दोन्ही खांद्यावर चिरलेला. |
| | रेनकोट | खाकी रंगाचा |
| | बॅरेट कॅप | वूलन निळ्या रंगाची, अखंड शुभ्रधातूची 'वने' अक्षरे असलेल्या बॅजसहीत. |
| | बूट | 'हंटर' ठराविक पद्धतीचे |
| | सॉक्स | खाकी स्ट्रेचेबल टेरिकॉट |
| | पाण्याची बाटली | ३.५ लिटर क्षमता |
| | हॅवरसॅक | खाकी रंगाचा कॅनव्हास |
| | काठी | १०५ से.मी. लांब, २.५ सें.मी. व्यास |














# वनरक्षक

| पदनाम | | गणवेषाच्या बाबीचे विवरण |
|---|---|---|
| वनरक्षक | पॅन्ट | खाकी टेरिकॉट (६७% पॉलीस्टर आणि ३३% कॉटन). तळकाठ न दुमडलेले, चामडी पट्ट्यासाठी तीन एकेरी पट्ट्या, दोन्ही बाजूला सरळ खिसे, पाठीमागे एक खिसा. |
| | बुशशर्ट | खाकी टेरिकॉट कापड (६७% पॉलीस्टर आणि ३३% कॉटन) अर्ध्या बाह्याचे दोन पॅच पॉकेटसह, १२.५ सें.मी. × १४ सें.मी.चे खिसे, प्रेस बटणासह, खांदपट्ट्या त्यावर ''महाराष्ट्र वन विभाग'' बॅजसाठी दोन छिद्रे. |
| | नामनिर्देश पट्टी | २ से.मी. × ८ से.मी. काळ्या रंगाच्या पट्टीवर पांढरी नामनिर्देशक अक्षरे. |
| | पट्टा | ५ से.मी. रूंदीच्या तपकिरी रंगाचा चामड्याचा पट्टा क्रोमीयम प्लेट बक्कलावर 'वने' अक्षरे असलेला. |
| | शिट्टी | 'थंडर' शिट्टी, काळ्या दोरीला बांधून छातीवरील डाव्या खिशात ठेवलेली. |
| | जरसी | हिरवटसर खाकी रंगाची, 'व्ही' आकाराचा गळा, कॉलर नसलेली, दोन्ही खांद्यावर चिरलेला. |
| | रेनकोट | खाकी रंगाचा |
| | टोपी | 'एफ' कॅप, खाकी वुलन, हिरवट कडा, शुभ्र धातूचा मोनोग्राम, दोन पांढऱ्या बटणासह. |
| | बूट | 'हंटर' बूट |
| | सॉक्स | खाकी स्ट्रेचेबल टेरिकॉटन |
| | पाण्याची बाटली | ३.५ लिटर क्षमता |
| | हॅवरसॅक | खाकी रंगाचा कॅनव्हास |










# वाहन चालक

कार

## वाहन चालकांसाठी गणवेष

शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्रमांक सीएलओ- १०८२ / ९९२९ / २९ दिनांक २५.९.९२ नुसार वाहन चालकांना दोन वर्षातून एकदा गणवेषासाठी रक्कम देण्यासंबंधी आदेश आहेत. मुख्य वनसंरक्षक (उत्पादन) महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचे ज्ञापन कक्ष - ८ / भांडार / २९ / ९०-९१ / ८६१ नागपूर, दि. ६.१२.९१ अन्वये वनविभागातील वाहन चालकांना टेरीकॉट गणवेष पुरविण्याबाबत आदेश आहेत.

### अ) ॲम्बॅसिडर कार चालकांसाठी

(सर्व मुख्य वनसंरक्षक, वनसंरक्षक यांचे वाहनावरील चालक)

१. दोन गणवेषांपैकी एक गणवेष सफेद राहील व दुसरा खाकी (६७% पॉलिस्टर व ३३% व्हीसकॉटन)

२. मिलीटरी सदृश्य सफारी पद्धतीचे लांब हाताचे बुश शर्ट, खांद्यावर पट्टी, पट्टीवर 'वनविभाग' नावाचे धातूचे बक्कल उजव्या खिशावरती २ से. मी. × ८ से. मी. आकाराची काळी प्लॅस्टिकची नेमप्लेट डाव्या खिशावर २ से. मी. × ८ से. मी. आकाराची काळी प्लॅस्टिकची 'वाहनचालक' अशी नेमप्लेट. (नेमप्लेट वरील अक्षरे सफेद रंगातील असावीत.)

३. पूर्ण विजार (फूल पँट)

४. गडद निळी वनपीस बॅरेट कॅप, कॅप वरती पितळी M. F. D. किंवा 'वनविभाग' दर्शक बिल्ला.

५. पायमोजे खाकी किंवा त्यासारख्या रंगाचे


६. काळ्या रंगाचे चामड्याचे पॉलिश करता येतील असे बूट

### ब) इतर सर्व वाहन चालकांसाठी

इतर सर्व वाहन चालकांसाठी गणवेष वरील प्रमाणेच राहील, तथापि दोन्ही गणवेषाचे संच खाकी रंगाचे असतील.








# वाहन चालक

कार / जीप

# वाहनचालकांनी पाळावयाची शिस्त व शिष्टाचार

१. गणवेष योग्य, विहित, नीटनेटका व स्वच्छ असावा.

२. अधिकाऱ्यास योग्य प्रकारे अभिवादन करावे. गणवेषामध्ये असताना सलामी द्यावी.

३. वक्तशीरपणा अंगी असावा.

४. अधिकारी वाहनात स्थानापन्न होई पावेतो वाहनचालकाने वाहनात बसू नये तसेच अधिकारी वाहनातून उतरण्यापूर्वी वाहन चालकाने वाहनातून उतरावे.

५. कार असल्यास अधिकारी बसताना व वाहनातून उतरताना दरवाजा उघडून दरवाजा हाती धरून शिस्तीत उभे रहावे.

६. वाहन चालकाची भाषा सौम्य असावी.

७. वाहन चालू असताना आवश्यक तेवढेच संभाषण करावे.

८. सोबत प्रवास करणाऱ्यांशी वाहन चालकाचा व्यवहार शिष्ट संमत असावा.

९. सर्वसाधारण वागणुक सौहार्द, सलोख्याची व सहकार्याची असावी.

१०. एखाद्या नविन ठिकाणी गेल्यास वाहनचालकाने अधिकारी उतरण्यापूर्वी समोर जाऊन तेथील व्यक्तींना अधिकाऱ्यांचा परिचय द्यावा.

११. वाहन चालविताना इतर वाहनांबाबत तसेच लोकांबाबत चांगला दृष्टीकोन ठेवून शासनाची प्रतिमा उंच ठेवावी.

१२. वाहन चालकाचा दृष्टीकोन नेहमी सकारात्मक असावा.

१३. वाहन चालकांनी स्वतःहून वाहनाची योग्य प्रकारे देखभाल करावी.

१४. ड्रायव्हिंग करताना अधिकारी अगर प्रवाशांकडून विचारण्यात आलेल्या प्रश्नांचे उत्तर देताना त्यांचेकडे बघून बोलण्याची गरज नाही, लक्ष रत्स्यावर ठेवून उत्तर द्यावे.

१५. मागून येणाऱ्या रूग्ण वाहिकेला नेहमी आधी जावू द्यावे.

## चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांसाठी गणवेष

## चपराशी व वरिष्ठ श्रेणी सेवकांना गणवेषाच्या कापडाचा पुरवठा करणे.

महाराष्ट्र शासनाच्या निरनिराळ्या विभागातील चपराशी आणि वरिष्ठ श्रेणी सेवक (नाईक, हवालदार आणि चोपदार) यांच्या गणवेषासाठी सुती व लोकरीचे कापड आणि इतर उपसाधने, संचालक, शासकीय मुद्रण व लेखन सामुग्री यांच्या संग्रही ठेवण्यात येतील व शासनाने वेळोवेळी दिलेल्या आदेशानुसार संचालक, शासकीय मुद्रण व लेखनसामुग्री यांच्यामार्फत पुरविली जातील. याला अपवाद, फक्त ज्या विभागांना त्यांची व्यवस्था त्यांनाच करण्यासाठी विशिष्टतया प्राधिकृत करण्यात आलेले आहे असे विभाग असतील, यासाठी महाराष्ट्र आकस्मिक खर्च नियम, १९६५ चा नियम १०४ (१) व (२) [वित्तीय प्रकाशन क्रमांक ९] पहावा.

## सुती व लोकरीच्या गणवेषाचे स्वरूप

चपराशी, नाईक व हवालदार यांच्या लोकरीच्या सुटामध्ये 'जोधपूरी' प्रकारचा कोट व पँट यांचा समावेश असेल.

सुती सुटामध्ये पूर्ण बाह्यांचा बुश शर्ट पुढील बाजूस, आवरणांसहीत दोन खिसे, खांद्यावरील पट्ट्या, शिवलेला अर्धा पट्टा व पँट यांचा समावेश असेल.

## पुरवठ्यासाठी विहीत केलेले प्रमाण

| क्र. | गणवेष | गणवेषाचा रंग | कापडाची प्रत | कापडाचे सरासरी प्रमाण | कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| १. | पुरूष कर्मचारी | | | | |
| | २ अर्ध्या बाह्यांचे बुशशर्ट | खाकी | ४८% पॉलिस्टर ५२% कॉटन | २ मीटर प्रति शर्ट | २ वर्षासाठी |
| | २ लांब विजारी | खाकी | ६७% पॉलिस्टर ३३% कॉटन | १.३० मीटर प्रति विजार | २ वर्षासाठी |
| २. | ३ टोप्या | उदी रंग | खादी | ७० सें.मी. रूंदीचे १ मीटर | २ वर्षासाठी |
| ३. | नाईक हवालदारांचे सुट | निळा | उच्च प्रतीचे लोकरी कापड | १४० सें.मी. रूंदीचे ३ मीटर | ४ वर्षासाठी |
| ४. | चपराशी - सुट | निळा | जाडेभरडे लोकरी कापड | १४० सें.मी. रूंदीचे ३ मीटर | ४ वर्षासाठी |
| ५. | प्रत्येक लोकरी सुटासाठी | | अस्तराचे कापड | गरजेनुसार अवश्यक तेवढे | ४ वर्षासाठी |
| ६. | राज्य चिन्ह असलेली क्रोमियम प्लेटची बटणे. | | | ९ बटणे | प्रत्येकी ३ वर्षासाठी |

## महिला चपराशांना गणवेष

| क्र. | गणवेष | गणवेषाचा रंग | टेरिकॉट कापडाची प्रत | कापडाचे सरासरी प्रमाण | कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| १. | ३ साड्या | फिकट निळ्या रंगाच्या काळी किनार असलेल्या | ६७% पॉलिस्टर ३३% कॉटन | ५ मीटर प्रत्येक साडी | २ वर्षासाठी |
| २. | ३ ब्लाउज | फिकट निळा | ४८% पॉलिस्टर ५२% कॉटन | ८० से.मी. प्रत्येक ब्लाउज | २ वर्षासाठी |
| ३. | १ जरसी | | लोकरी | | २ वर्षासाठी |

## सफाईगार यांना गणवेषाचे कापड पुरविणे

**पुरूषांसाठी**

| | | |
|---|---|---|
| १. | अर्ध्या बाह्यांचे शर्ट व अर्ध्या पँट ३ जोड्यांसाठी आणि ३ टोप्या यांच्यासाठी ७० से. मी. रूंद निळ्या रंगाची दोसुती खादी. | दरवर्षी १४.५० मीटर |

**महिलांसाठी**

| | | |
|---|---|---|
| २. | निळ्या रंगाची खादीची साडी | दर वर्षाला तीन |
| | खादी परकर | दर वर्षाला तीन |
| | निळ्या रंगाचा ब्लाउज | दर वर्षाला तीन |

## गणवेषासाठी प्लॅस्टिकचे बिल्ले

चपराशांना आणि वरिष्ठ श्रेणी सेवकांना संबंधित विभागाचे / कार्यालयाचे नाव असलेले प्लॅस्टिकचे बिल्ले देण्यात येतील.

## वनपाल / वनरक्षक यांचेसाठी रिबन

महाराष्ट्र शासन महसूल व वन विभाग निर्णय क्रमांक १०९५ / प्र. क्र. २२५ / फ-५ दि. ४ ऑगस्ट ९५ अन्वये उजळणी प्रशिक्षण सत्रात प्रथम, द्वितीय, तृतीय स्थान प्राप्त करणाऱ्या वनपाल व वनरक्षक यांना रिबन प्रदान करून मान देण्यात येत आहे. सदर रिबन गणवेषाचा भाग असून त्याचा आकार ५ से. मी. × १.५ से. मी. आणि त्याचे वरील मेटालिक झाडाचा आकार उंची १.५ से. मी. व क्राऊन रूंदी १.८ से.मी. असा आहे.

| सत्र | स्थान | स्वरूप |
|---|---|---|
| वनपाल प्रशिक्षण सत्र | प्रथम | केसरी रिबनवर मेटालिक झाड (सोनेरी रंग) |
| | द्वितीय | केसरी रिबनवर मेटालिक झाड (स्टील रंग) |
| | तृतीय | केसरी रिबनवर मेटालिक झाड (काळा रंग) |
| वनरक्षक प्रशिक्षण सत्र | प्रथम | पोपटी हिरव्या रिबनवर मेटालिक झाड (सोनेरी रंग) |
| | द्वितीय | पोपटी हिरव्या रिबनवर मेटालिक झाड (स्टील रंग) |
| | तृतीय | पोपटी हिरव्या रिबनवर मेटालिक झाड (काळा रंग) |

## ओळख करून देणे


ओळख करून देताना सर्व प्रथम महिलांची ओळख करून द्यावी. तसेच उपस्थित अधिकाऱ्यांपैकी सर्वात जेष्ठ अधिकाऱ्याची ओळख प्रथम द्यावी. नंतर इतरांची जेष्ठतेप्रमाणे ओळख करून द्यावी.

# रिबन

## वनपाल



प्रथम क्रमांक



द्वितीय क्रमांक



तृतीय क्रमांक

## वनरक्षक



प्रथम क्रमांक




द्वितीय क्रमांक



तृतीय क्रमांक

| विश्राम | सावधान |
| --- | --- |



### सावधान

१. या अवस्थेत संपूर्ण शरीर ताठ असावे.
२. नजर थेट समोर स्थिर रोखलेली असावी.
३. मान ताठ ठेवून हनुवटी जमिनीला समांतर असावी.
४. ओठ बंद असावे. चेहऱ्यावर करारीपणा असावा.
५. छाती विस्तारून पुढे काढावी.
६. हात ताठ ठेवून ते शरीराला चिकटून असावेत. हाताचा कोपरा आणि शरीर यात अंतर नसावे. अंगठा बाहेर ठेवून हाताच्या मुठी बंद असाव्यात. अंगठा पँटच्या शिलाईवर ठेवून त्याची दिशा खालच्या बाजूस असावी. (कृपया चित्र क्र. २ पहावे.)
७. दोन्ही पायात अंतर नसावे.
८. पायांच्या टाचा मागील बाजूस चिकटून ठेवाव्यात. दोन्ही पायांच्या तळव्यात अंतर ठेवताना टाचेजवळ ३० अंशाचा कोन ठेवावा.
९. दोन्ही पायांवर शरीराचा भार सारखाच असावा.
१०. शरीर जमिनीला लंबरूप असावे.

### सावधान - विश्राम - सावधान कृती

१. विश्राम करण्याचे आदेश होताच डावा पाय आणि दोन्ही हात यांची हालचाल एकाच वेळेस आणि एकाच गतीत करावी.
२. डावा पाय जमिनीपासून अंदाजे २० ते २२ से. मी. (८ ते ९ इंच) पर्यंत उचलून जमिनीवर जोरात ३० से. मी. अंतरावर आपटून ठेवायचा आहे. पायाच्या दोन्ही टाचेमधील अंतर ३० से. मी. तर दोन्ही पायाच्या अंगठ्यामधील अंतर ४५ से. मी. ठेवावे.
३. त्याच वेळी दोन्ही हात मागील बाजूस न्यावेत. डाव्या हाताच्या तळव्यावर उजव्या हाताचा तळवा स्थिर ठेवावा आणि दोन्ही पायांवर शरीराचा भार सारखाच ठेवावा.
४. क्रिया करताना नजरेची आणि मानेची हालचाल करावयाची नाही.
५. सावधान करण्याचे आदेश होताच डावा पाय आणि दोन्ही हात यांची हालचाल एकाच वेळेस आणि एकाच गतीत करावी.

### विश्राम

१. या अवस्थेत संपूर्ण शरीर ताठ असावे.
२. नजर थेट समोर स्थिर रोखलेली असावी.
३. मान ताठ ठेवून हनुवटी जमिनीला समांतर असावी.
४. ओठ बंद असावे. चेहऱ्यावर करारीपणा असावा.
५. छाती विस्तारून पुढे काढावी.
६. हात मागील बाजूस असावेत. डाव्या हाताच्या तळव्यावर, उजव्या हाताचा तळवा स्थिर ठेवावा. दोन्ही हाताचे तळवे एकमेकात गुंतविताना डाव्या हाताचा तळवा उजव्या तळव्यावर ठेवावा आणि उजव्या हाताचा अंगठा डाव्या अंगठ्यावर ठेवावा. हात आणि शरीर यांत अंतर नसावे. (चित्र क्र. ४)
७. दोन्ही पायात अंतर असावे. पायाच्या दोन्ही टाचेमधील अंतर ३० से. मी. (१२'') तर दोन्ही पायाच्या अंगठ्यामधील अंतर ४५ से. मी. (१८'') असावे. शरीराचा भार दोन्ही पायावर सारखाच ठेवावा.


तेजचल
सावधान चल

## परेड (संचलन)

१. संचलनाची सुरूवात करताना प्रथम डावा पाय पुढे टाकावा.

२. नजर समोर ठेवावी, मान ताठ ठेवून हनुवटी जमिनीला समांतर असावी.

३. पाय पुढे टाकताना गुडघ्यात न वाकविता ताठ ठेवावा. ( आकृती अ. क्र. ४)

४. पाय पुढे जमिनीवर टेकवताना पायाचा तळवा जमिनीला ४५ अंशाच्या कोनात ठेवून तळव्याची टाच जमिनीवर जोरात आपटावी. (आकृती अ. क्र. ५)

५. हात कोपऱ्यात न वाकवता ताठ ठेवावेत. दोन्ही हातांची आंदोलने अशा प्रकारे द्यावीत की अंगठ्याची स्थिती खांद्याच्या पातळीपर्यंत आली पाहिजे. जेणेकरून हातांची स्थिती जमिनीला समांतर राहतील.

६. हातांची आंदोलने शरीरालगत असावीत.

७. हातांचे तळवे (बंद मुठी) शरीराकडे आंदोलने घेताना ठेवावीत.

८. डावा पाय पुढे टाकताना उजवा हात पुढे ठेवावा, याच वेळी उजवा पाय आणि डावा हात मागे राहतील.

९. जमिनीवर टाच आदळतानाच्या स्थितीला / क्षणाला समोरील हाताचा अंगठा हा खांद्याच्या पातळीत आलेला असेल.

१०. जमिनीवर पावले ही चालण्याच्या दिशेत सरळ व एकमेकास समांतर असावीत.

११. पाऊल पुढे टाकताना पुढील पायाची टाच आणि मागील पायाचा अंगठा यामधील अंतर सरासरी ३७ / ३८ से. मी. (१५'') ठेवावे.

१२. थांब हुकूम होताच प्रथम उजवा पाय आखूड टाकून, डावा पाय जमिनीवर आदळवा व त्याचेच शेजारी उजवा पाय उचलून जोरात आदळावा, याच वेळी हातांची आंदोलने तात्काळ थांबवावीत व सावधान अवस्थेत उभे रहावे.

१३. परेड चालू असताना पीछे मुडचे आदेश झाल्यावर पाय न आदळता उजव्या बाजूने मागे १८० अंश वळावे.

१४. परेड चालू असताना दहिने मुडचे आदेश झाल्यावर उजव्या पायावर ९० अंश वळून डावा पाय उंचावून जमिनीवर न आपटता (अलगद ठेवून) पुढे परेड चालू ठेवावी.

१५. परेड चालू असताना बाये मुडचे आदेश झाल्यावर डाव्या पायावर ९० अंश वळून उजवा पाय उंचावून जमिनीवर न आपटता (अलगद ठेवून) पुढे परेड चालू ठेवावी.

१६. अ. क्र. (१३), (१४), (१५) मधील क्रिया परेड चालू नसताना करावयाच्या असतील (सावधान स्थितीत करावयाच्या असतील) तर संबंधीत पाय जमिनीवर जोरात आपटावा.

१७. 'परेड घूम' आदेश झाल्यावर पुढील तिघे ज्या पद्धतीने वक्राकार वळतील त्याचेच अनुकरण मागच्यांनी करीत त्यांच्या मागे जावे.

## धीरे चल (स्लो मार्च)

१. मान ताठ ठेवावी.

२. नजर समोर स्थिर ठेवावी.


३. दोन्ही हात शरिरालगत ताठ ठेवावेत.

४. पाय गुडघ्यात न वाकविता पुढे झटका देत परंतु सावकाश टाकावा.

५. पाय पुढे टाकताना पायाचा तळवा ताठ आणि पुढील टोक जमिनीच्या दिशेने असावे.


६. जमिनीवर प्रथम टाचेचा शेंडा (Toes) टेकवावा व नंतर टाच (heel) टेकवावी.

७. पाऊल पुढे टाकताना पुढील पायाची टाच आणि मागील पायाचा अंगठा यामधील अंतर ३७ ते ३८ से. मी. (१५'') ठेवावे.


१
२
३
X

## सलामी (मानवंदना)

१. सलामी (मानवंदना) ही सावधान स्थितीत राहूनच द्यावयाची आहे. यासाठी उजवा पाय जमिनीवर आपटून प्रथम सावधान स्थिती घ्यावी.
२. सलामी (मानवंदना) साठी उजव्या हाताचाच उपयोग करावयाचा आहे.
३. डावा हात शरीरालगत ठेवून शरीराची हालचाल न करता उजवा हात शरीरापासून दूर नेताना हाताचा पंजा उघडा करावा. हाताचा अंगठा तळव्यास चिकटून असावा, तर पंजाची सर्व बोटे एकमेकास चिकटलेली असावी. (क्र.२)
४. उजवा हात खांद्याच्या रेषेत वर नेताना ताठ असावा आणि खांद्याच्या रेषेत आल्यावर तो जमिनीशी समांतर ठेवण्याची दक्षता घ्यावी. (क्र.३)
५. हात खांद्याच्या रेषेत येताच कोपऱ्यातून झटका देवून डोक्याच्या दिशेने दुमडून पंज्याचा तळवा दर्शनी बाजूस ठेवून, पंज्याचा मागील भाग उजव्या भुवईवर स्थिर करावा.
६. पंजाची तर्जनी उजव्या डोळयाच्या भुवईच्या मध्यावर, भुवईपासून वर साधारणपणे २ से. मी. अंतरावर स्थिर करावी.
७. पंजाची कपाळावरील स्थिर स्थिती २ सेकंदापर्यंत असावी.
८. हात खाली आणताना सरळ झटक्याने आणावा. (आकृती नं.३)
९. हात खाली आणताना पंजाची घडी करावी व सावधान स्थितीत उभे रहावे.
१०. हात वर घेणे, सलामीच्या स्थितीत स्थिर ठेवणे व हात खाली आणणे या तिन्हीसाठी प्रत्येकी दोन सेकंद लावावेत.
११. सलामी स्विकारल्यानंतर एक पाऊल मागे घेऊन विश्राम स्थितीत थांबावे.
१२. रस्त्यात वरिष्ठ समोरून चल स्थितीत भेटले तर महोदयांनी थांबण्याचे सूचित न केल्यास त्यांच्याकडे पाहून चालतच सलामी द्यावी. ही सलामी आपली पाच पावले पूर्ण होईपर्यंत स्थित ठेवावी. नंतर नेहमीप्रमाणे चालवे.
१३. अचानक वरिष्ठ समोर आल्यास आणि त्यावेळी डोक्यावर टोपी नसल्यास वरील प्रमाणे हाताची कार्यवाही न करता खालील प्रमाणे मानवंदना द्यावी.
    अ) सावधान स्थितीत यावे.
    ब) पायाच्या टाचा जमिनीपासून २ ते ३ से. मी. वर उचलाव्यात. त्याच वेळी खांदे किंचीतसे वर उचलून मागे घ्यावे आणि छाती ताठ फुगवून पुढे घ्यावी.
    क) नजर स्थिर ठेवावी.
१४. दुचाकी वाहनावर असताना, महोदयांनी थांबण्याचे सूचित न केल्यास वाहन थांबवून खाली उतरून वरीलप्रमाणे सलामी न देता खालीलप्रमाणे सलामी द्यावी.
    अ) वाहन चालवीतच सलामी द्यावी.
    ब) दोन्ही हात ताठ करावेत.
    क) कमरेवरील भाग छाती फुगवून ताठ ठेवावा.
    ड) नजर स्थिर ठेवावी.
    इ) मानेची किंचितशी हालचाल करावी.
    फ) महोदयांनी थांबण्याचे सूचित न केल्यास पुढे निघून जावे.
१५. समोर अनेक अधिकारी असल्यास त्यापैकी सर्वात जेष्ठ अधिकारी यांनाच सलामी द्यावी.
१६. (काही अधिकारी अनोळखी असल्यास ओळखी पैकी सर्वात जेष्ठ अधिकाऱ्यास सलामी द्यावी.) नंतर जेव्हा एखाद्या अधिकाऱ्याचा परिचय देण्यात आला तेव्हाच त्यांना सलामी द्यावी.




गार्ड ऑफ ऑनर

# गार्ड ऑफ ऑनर

१. पाहुणे व्यासपीठावर येईपर्यंत गाइडनी 'क' वर थांबावे.

२. पाहुणे व्यासपीठावर आल्यावर परेडला सावधान व 'खुली लाईन चल' चे आदेश द्यावेत.

३. गाईडने तेज संचलन करून व्यासपीठाकडे 'ड' पर्यंत जावे. पाहुण्यांना सलामी देवून 'परेड निरीक्षणासाठी हजर आहे श्रीमान' असे बोलावे.

४. पाहुणे परेडकडे जाण्यास निघाले असता त्यांच्या पुढे तेज संचलन करीत 'A' वर जावून थांबावे, दाहिने मुड करून पाहुणे जवळ आल्यावर सावधान चाल (स्लो मार्च) करावी.

५. 'B' वर येवून थांबावे, दाहिने मुड करून तेज संचलन करून 'क' वर जावून थांबावे.

६. पाहुणे व्यासपीठावर परत आल्यावर तेज संचलन करून त्यांचे जवळ 'ड' पर्यंत जावून सलामी द्यावी व विसर्जन ची परवानगी घ्यावी.

७. परवानगी मिळाल्यावर परत 'क' वर जावून 'निकट लाइन चल' 'विश्राम' 'सावधान' व 'विसर्जन' हे आदेश द्यावे.

८. 'विसर्जन' आदेश मिळाल्यावर 'दाहिने मुड' घेवून चार पावले मार्च करून विसर्जित व्हावे.

**चांगला गणवेष हा विभागातील**
**शिस्त आणि शिष्टाचारांचा आरसा आहे**


1
2
3
4
5
6
7
8
9
10
11
12

# दिक्षांत समारंभ

प्रमाणपत्र / बक्षीस स्विकारण्याची पद्धत

१. नाव पुकरताच जागेवरून संचलन करीत स्टेजवर पाहुण्यांसमोर जावून थांबावे. लगेच बाये मुड / दाहिने मुड करून सावधान स्थिती घ्यावी व सलामी द्यावी. (चित्र क्र. १,२,३,४,५)

२. एक पाऊल पुढे टाकून सावधान स्थिती घ्यावी आणि प्रमाणपत्र / बक्षीस घेण्यास मान न वाकविता दोन्ही हात पुढे करून प्रमाणपत्र / बक्षीस / पदक स्विकारावे. (चित्र क्र. ६) व प्रमाणपत्र डाव्या हातात ठेवावे. (चित्र क्र. ७)

३. पाहुण्यांनी हस्तांदोलनासाठी हात पुढे केला तरच आपण हस्तांदोलन करावे.

४. एक पाऊल मागे जाऊन सावधान स्थिती घ्यावी आणि परत पाहुण्यांना सलामी द्यावी. (चित्र क्र. ८)

५. बाये मुड / दाहिने मुड / पीछे मुड करून संचलन करत आपल्या आसनाकडे जाऊन बसावे. (चित्र क्र. ९, १०, ११, १२)

६. पायरी चढताना व उतरताना पायाची समोरील बाजू जमिनीवर प्रथम टेकवावी व हात स्थिर ठेवावे. (चित्र क्र. २ व ११)

## विशेष सूचना

अ) वरील क्रिया करताना पायांचा फार मोठा आवाज होणार नाही याची काळजी घ्यावी.

ब) गणवेष धारण केला असताना पाहुण्यांच्या पाया पडू नये किंवा नतमस्तक होऊ नये.

क) पहिला प्रशिक्षणार्थी बक्षिस घेत असताना त्यानंतरच्या प्रशिक्षणार्थीने स्टेजकडे संचलन करीत ठरवून दिलेल्या जागेत थांबावे आणि नाव पुकारताच संचलन करीत प्रमाणपत्र / बक्षीस स्विकारण्यास पुढे संचलन करीत जावे. जेणेकरून प्रशिक्षणार्थीची वाट पाहण्यात पाहुण्यांचा वेळ जाऊ नये.

ड) फित / पदक स्विकारताना सावधान स्थितीत रहावे आणि फित / पदक लावण्याचे काम पाहुण्यांना करू द्यावे.

इ) दिक्षांत समारंभ चालू असताना कुजबूज अथवा आपसात बोलू नये.

फ) प्रमाणपत्रासंबंधी काही शंका असल्यास समारंभ पूर्ण झाल्यावर संबंधीत अधिकाऱ्यास भेटावे.

ग) एकमेकांची प्रमाणपत्रे बघण्यात अथवा त्यासंबंधी चर्चा करू नये.

## गणवेष पुरवठा

| पदनाम | गणवेषाचा प्रकार | गणवेष देण्याचा कालावधी | ४ वर्षासाठी परिमाण |
|---|---|---|---|
| **वनक्षेत्रपाल** | पॅन्ट | दोन वर्षातून एकदा | ४.८ मिटर |
| | बुशशर्ट | दोन वर्षातून एकदा | ८ मिटर |
| | स्टार | दोन वर्षातून एकदा | १२ नग |
| | नामनिर्देश पट्टी | दोन वर्षातून एकदा | २ नग |
| | पट्टा | दोन वर्षातून एकदा | २ नग |
| | शिट्टी | दोन वर्षातून एकदा | २ नग |
| | जरसी | चार वर्षातून एकदा | १ नग |
| | रेनकोट | चार वर्षातून एकदा | १ नग |
| | टोपी (बॅरेट कॅप) | दोन वर्षातून एकदा | २ नग |
| | चामड्याचे जोडे | दोन वर्षातून एकदा | २ जोड |
| | हंटर जोडे | दोन वर्षातून एकदा | २ जोड |
| | मोजे | दोन वर्षातून एकदा ४ जोडे | ८ जोड |
| **वनपाल** | पॅन्ट | दोन वर्षातून एकदा | ४.८ मिटर |
| | बुशशर्ट | दोन वर्षातून एकदा | ८ मिटर |
| | स्टार | दोन वर्षातून एकदा | ४ नग |
| | नामनिर्देश पट्टी | दोन वर्षातून एकदा | २ नग |
| | पट्टा | दोन वर्षातून एकदा | २ नग |
| | शिट्टी | दोन वर्षातून एकदा | २ नग |

| पदनाम | गणवेषाचा प्रकार | गणवेष देण्याचा कालावधी | ४ वर्षासाठी परिमाण |
|---|---|---|---|
| | जरसी | चार वर्षातून एकदा | १ नग |
| | रेनकोट | चार वर्षातून एकदा | १ नग |
| | टोपी (बॅरेट कॅप) | दोन वर्षातून एकदा | २ नग |
| | हंटर शूज | दोन वर्षातून एकदा | २ जोड |
| | खाकी मोजे | दोन वर्षातून एकदा | ८ जोड |
| | पाण्याची बाटली | चार वर्षातून एकदा | १ नग |
| | हॅवरसॅक | चार वर्षातून एकदा | १ नग |
| | काठी | चार वर्षातून एकदा | १ नग |
| **वनरक्षक** | पॅन्ट | दोन वर्षातून एकदा | ४.८ मिटर |
| | बुशशर्ट | दोन वर्षातून एकदा | ८ मिटर |
| | नामनिर्देश पट्टी | दोन वर्षातून एकदा | २ नग |
| | पट्टा | दोन वर्षातून एकदा | २ नग |
| | शिट्टी | दोन वर्षातून एकदा | २ नग |
| | जरसी | चार वर्षातून एकदा | १ नग |
| | रेनकोट | चार वर्षातून एकदा | १ नग |
| | एफ कॅप | दोन वर्षातून एकदा | २ नग |
| | हंटर जोडे | दोन वर्षातून एकदा | २ जोड |
| | मोजे | दोन वर्षातून एकदा | ८ जोड |
| | पाण्याची बाटली | चार वर्षातून एकदा | १ नग |
| | हॅवरसॅक | चार वर्षातून एकदा | १ नग |

## वनपाल व वनरक्षक यांनी दररोज जवळ बाळगण्याचे साहित्य

| वनपाल | | वनरक्षक | |
|---|---|---|---|
| १. Tape | – मोजमाप टेप | १. Tape | – मोजमाप टेप |
| २. Order book | – आदेश पुस्तिका | २. Order book | – आदेश पुस्तिका |
| ३. Round map | – वन मंडळाचा नकाशा | ३. Beat map / book | – नियत क्षेत्राचा नकाशा |
| ४. Kawati | – खुपरी | ४. Hammer | – शिक्का |
| ५. Siezure hammer | – जप्ती शिक्का | ५. Kawati | – खुपरी |
| ६. P. O. R. Book | – प्रथम गुन्हा नोंद पुस्तक | ६. P. O. R. Book | – प्रथम गुन्हा नोंद पुस्तक |
| ७. Compass | – कंपास | ७. Compass | – कंपास |
| ८. Torch | – (बॅटरी) | ८. Torch | – (बॅटरी) |
| ९. कोरे कागद | | ९. कोरे कागद | |
| १०. स्टँप पँड | | १०. स्टँप पँड | |
| ११. कार्बन पेपर | | ११. कार्बन पेपर | |

## ओळखव पत्र ठेवणे

प्रत्येक कर्मचाऱ्यांनी प्राधिकृत अधिकाऱ्याद्वारे देण्यात आलेले ओळखपत्र नेहमी सोबत ठेवणे आवश्यक आहे.



शासकीय फोटोझिंको मुद्रणालय, पुणे - १

शासकीय फोटोझिंको मुद्रणालय, पुणे - १